पाथेय भारत™

# बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सायबर जनजागृती मोहिमेला सुरुवात



**ठाणे (प्रतिनिधी):** सायबर गुन्ह्यांची संख्या झपाट्याने वाढत असताना, नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. हीच गरज लक्षात घेऊन बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे व क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे व नवी मुंबई परिसरात विशेष सायबर जनजागृती मोहिमेस सुरुवात झाली आहे.

या उपक्रमासाठी महाविद्यालयातील २० विद्यार्थ्यांच सायबर वॉरिअर टीम सज्ज झाली असून, एकूण-१० टीम्स तयार करण्यात आल्या आहेत. हे विद्यार्थी शाळा, महाविद्यालये, वसाहती आणि सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेची जाणीव निर्माण करत आहेत. या उपक्रमाचे नेतृत्व पुढीलप्रमाणे आहे– शिक्षक समन्वयक : तेजस जाधव सर, क्लब अध्यक्षा- श्रुती शिरसाट, सचिव- सैराज गुंड, उपक्रम संचालक- रोशनी वनारे, मीडिया संचालक : सुयश साबळे.

या विद्यार्थ्यांनी सायबर फसवणूक, OTP फ्रॉड, फिशिंग लिंक, सोशल मीडिया हॅकिंग, बनावट लॉटरी व UPI स्कॅम यासारख्या प्रकारांपासून नागरिकांनी सावध राहावे, यासाठी जनजागृती मोहीम राबवण्याचा निर्धार केला आहे.

लहान मुलांपासून ते वयोवृद्ध नागरिकांपर्यंत सर्वांना सायबर फसवणुकीपासून सुरक्षित राहण्याचे मार्गदर्शन या मोहिमेचा मुख्य हेतू आहे. यासाठी प्रात्यक्षिके, प्रश्नोत्तरे, माहितीपत्रके आणि संवाद सत्रांद्वारे सायबर सुरक्षेविषयी माहिती दिली जात आहे.

ही मोहीम सुरक्षित डिजिटल समाज निर्माण करण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल ठरत आहे. असे मत यावेळी प्राचार्या डॉ विंदा मांजरमकर यांनी व्यक्त केले.